सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम राबविण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह -२०२६/प्र.क्र.१४६/१३-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०४ ऑगस्ट, २०२६

संदर्भ- १) सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्र. GADIT ०८०/४/२०१४-०/० DIRECTORATE of IT-DIT (MH) दि.०५.१०.२०२३.
२) प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या विविध बैठकांचे इतिवृत्त (दि. २८/०३/२०२५, दि. ०२/०६/२०२५, दि. ११/११/२०२५, दि. २०/०५/२०२६).
३) उच्चाधिकार समिती बैठक इतिवृत्त GAD-मिसं०६४/५/२०२५-O/O Directorate of IT-DIT, दि.०४/११/२०२५.
४) शासन ज्ञापन क्र.कृषिआ-१२२६/प्र.क्र.१९/१६-अे, दि. २४/०३/२०२६.
५) संचालक (कृषि अभियांत्रिकी), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे दि. २५.०५.२०२६ रोजीचे पत्र.

प्रस्तावना:-

कृषि व पदुम विभागाचे (खुद्द) मंत्रालय तसेच कृषि आयुक्तालय व अखत्यारितील कार्यालयांचे संगणकीकरण बळकटीकरण व्हावे यासाठी "राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम" ही योजना राबविण्यात येते. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (खुद्द) व कृषि आयुक्तालयामार्फत ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येतात व विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत राज्य शासनातर्फे दरवर्षी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात येते व सदर मंजूर अनुदान कृषि व पदुम विभाग (खुद्द) तसेच कृषि आयुक्तालय, पुणे यांना आवश्यकतेनुसार विभागून वितरीत करण्यात येते.

राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम या योजनांतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशिर्ष २४५१ २७८२, १७-संगणक खर्च या उद्दीष्टाकरिता रु. ७५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर केली आहे. कृषि आयुक्तालय, पुणे यांनी उपरोक्त संदर्भांकित पत्राद्वारे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात "राज्य ई-गव्हर्नन्स योजना (कृषि)" अंतर्गत विविध १५ बाबींसाठी रक्कम रु. ७५००.०० लाख (रुपये पंच्याहत्तर कोटी फक्त) निधी खर्चास प्रशासकीय मान्यता मिळून तो उपलब्ध करून देण्याबाबतचा व तांत्रिक गरजेनुसार बाबनिहाय बदल करण्याचे प्राधिकार आयुक्त (कृषि) यांना प्रदान करण्यास हरकत नसावी यास्तव प्रस्ताव सादर केला आहे. सदर मागणी विचारात घेता रु. ७५००.०० लक्ष निधी खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

१. कृषि व पदुम विभाग, मंत्रालयीन कार्यालयांचे व कृषि आयुक्तालय, पुणे व अधिनस्त विविध कार्यालयाचे संगणकीयदृष्ट्या बळकटीकरण करण्यासाठी "राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम" ही राज्य योजना राबविण्यास मंजूरी देण्यात येत असून सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये रु. ७५००.०० लक्ष (रुपये पंच्याहत्तर कोटी फक्त) रकमेच्या मर्यादेत पुढीलप्रमाणे एकूण १५ बाबी राबविण्यास व निधी खर्चास याद्वारे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:

(रु. लाखात)

अ.क्र	**बाब**	**मागणी केलेला निधी**
१	आयटी ॲप्लिकेशन विकसन /व्यवस्थापन /देखभाल- (Developer Team)	२३८.४०
२	आयटी सल्लागार तांत्रिक मनुष्यबळ सेवा	१४८.३२
३	बिझनेस ॲनालिस्ट	११.६०
४	कृषी आयुक्तालय स्तरावरील हार्डवेअर देखभाल व दुरुस्ती करिता (FMS टीम)	३३.२८
५	नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई (पोक्रा)- आयटी सल्लागार	१६९.३३
६	नमो शेतकरी महासन्मान निधी या योजनेंतर्गत निधी वाटपाकरीता पोर्टल विकसित करणे	२०.१३
७	नमो शेतकरी प्रणाली देखभाल व व्यवस्थापन	१०७.५२
८	नमो क्लाऊड व्यवस्थापन	५०.४१
९	महाडिबीटी Farmer Application portal वर नवीन योजना नवीन मोड्युल विकसित करणे	४७.९६
१०	हार्डवेअर दुरुस्ती, कनेक्टिव्हीटी व सॉफ्टवेअर लायसन्स खरेदी	१८.९५
११	कृषी विभागाच्या आज्ञावली करिता Cloud व्यवस्थापन, SSL प्रमाणपत्र, Security Audit इ. संदर्भात सेवाशुल्क	२१५.३०
१२	नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई (पोक्रा)- क्लाउड व्यवस्थापन	१६०.४८
१३	लॅपटॉप खरेदी/पुरवठा	६१६५.००

१४	१ % आकस्मिक खर्च	१२.१८
	एकूण	७३९८.८६
१५	सन २०२५-२६ मधील हार्डवेअर खरेदी प्रलंबित निधी	१०१.१४
	एकूण निधी मागणी	७५००.००

२. सदर खर्च "मागणी क्रमांक डी-७" ३४५१-सचिवालय-आर्थिक सेवा, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) योजना (०२) (०४) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम अंमलबजावणी (कृषी) (३४५१ २७८२) १७-संगणक खर्च या मंजूर लेखाशीर्षाखालील तरतुदीमधून भागवला जाणार आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०४१८५२४२६५४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.08.04 18:53:25 +05'30'

(डॉ. ललितकुमार धायगुडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति-

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
२) मा. मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
७) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
८) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई / नागपूर.
९) वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०) संचालक, लेखा व कोषागारे मुंबई/अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
११) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष नवीन प्रशासकीय भवन ५ वा मजला, मुंबई
१२) कक्ष अधिकारी-१३-अे , कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई.
१३) निवड नस्ती-१३-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.